# डे. ए. सो. चे बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे -४
## शिष्यवृत्ती सूचना २०२३-२४

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये ज्या विद्यार्थ्यांनी अनुसूचित जाती व जमाती, इतर मागास वर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (SC,ST,OBC,VJNT,SBC,EWS) या संवर्गातून महाविद्यलयात (वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालय,अनुदानित विभाग) प्रवेश घेतला आहे त्या **सर्व विद्यार्थ्यांने शासनाने विहित केलेल्या नमुन्यात शिष्यवृत्ती/ फ्रीशिप चा ऑनलाइन अर्ज भरणे बंधनकारक आहे.** अशा सर्व विद्यार्थ्यांनी हा ऑनलाइन अर्ज **https://mahadbtmahait.gov.in** या वेबसाइटवर ऑनलाइन भरणे सुरू झाले आहे सदर **अर्ज व्यवस्थित पूर्ण भरून सर्व खालील कागदपत्रे जोडून महाविद्यालयातील कार्यालयात जमा करावेत.**

शिष्यवृत्ती (Scholarship) साठी **व्हीजेएनटी/ ईमाव / विमाप्र या संवर्गाकरिता उत्पन्न मर्यादा १,५०,०००/- असून, अनुसूचित जाती** वा **अनुसूचित जमाती या संवर्गाकरिता उत्पन्न मर्यादा** २,५०,०००/- इतकी आहे. तसेच फ्रीशिप **अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती** साठी उत्पन्न मर्यादा नसून, **व्हीजेएनटी/ ईमाव / विमाप्र साठी ची उत्पन्न मर्यादा रु.** ८,००,०००/- इतकी आहे.

**सर्व पात्र विद्यार्थ्यांनी स्वतः चा मोबाइल न.बँक खाते व आधार कार्ड शी लिंक करून घेणे आवश्यक आहे. तसे नसल्यास त्याची शिष्यवृत्ती/ फ्रीशिप जमा न झाल्यास ते स्वतः जबाबदार राहतील, तसेच एक वेळेस एकच शिष्यवृत्तीचा लाभ घेत येईल अर्ज भरताना कुठलीही अडचण येत असल्यास महाविद्यालयाच्या शिष्यवृत्ती विभागास संपर्क साधावा.**

**नवीन (फ्रेश) विद्यार्थ्यांसाठी** ऑनलाईन अर्ज भरताना विद्यार्थ्यांचे आधारकार्ड असणे आवश्यक आहे. आधारकार्डला मोबाईल नंबर व विद्यार्थ्यांचे बँक खाते न लिंक असणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्ज भरताना आधार कार्ड ला लिंक असलेल्या मोबाईल वर OTP येतो तो Verified करावा. खालील शिष्यवृत्ती/ फ्रीशीपचा अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांनि उपरोक्त वेबसाईटवर लॉगिन करून त्यातील Profile मधील सहा टॅब **(Personal Information, Address Information, Other Information, Current Course, Past Qualification, Hostel Details)** व्यवस्थित भरणे आवश्यक आहे. प्रोफाइल पूर्ण भरून झाल्यावर खालीलपैकी योग्य ती स्कीम निवडून अप्लाय करावी.

**रिन्यूअल विद्यार्थ्यांसाठी** ऑनलाईन अर्ज भरताना Profile मधील Personal Information मध्ये Income certificate ची माहीती अपडेट करावी. व Current Course मधील माहिति अपडेट करून गुणपत्रिका अपलोड करावी व चालू वर्षाची माहिती भरून व फी शून्य टाकावी. प्रोफाइल पूर्ण भरून झाल्यावर संवर्गानुसार योग्य ती स्कीम निवडून अप्लाय करावे .

**शिष्यवृत्ती/ फ्रीशीप साठी आवश्यक असणारे सर्व मूळ कागदपत्रे (Original Documents) अपलोड करावीत**

१. शिष्यवृत्ती/ फ्रीशीप अर्ज -२०२३-२४ (अर्जावर शेवटच्या पानावर विद्यार्थ्यांची व पालकाची नाव व सही करणे आवश्यक)
२. कुटुंबाचा उत्पन्नाचा दाखला ( २०२२-२३ चा तहसीलदार यांनी दिलेला)
३. रहिवासी / डॉमिसाईल प्रमाणपत्र (तहसीलदार यांनी दिलेला)
४. विद्यार्थ्यांचे जातीचे प्रमाणपत्र
५. रेशन कार्ड झेरॉक्स
६. गुणपत्रिका झेरॉक्स (गुणपत्रिका - १० वी, १२ वी, एफ वाय बी कॉम, एस वाय बी कॉम, टी वाय बी कॉम, एम कॉम -१)
७. महाविद्यालय प्रवेश पावती झेरॉक्स
८. वसतिगृह प्रवेश पावती झेरॉक्स (आवश्यक असल्यास)
९. खंड प्रमाणपत्र (Gap Certificate) (आवश्यक असल्यास)
१०. विहित नमुन्यातील प्रतिज्ञा पत्र
११. शाळा/ महाविद्यालय सोडल्याचा दाखला (१० वी / १२ वी / टी. वाय बी. कॉम.)
१२. आधार कार्ड झेरॉक्स
१३. बँक पास बुक झेरॉक्स (आधार कार्डशी लिंक असलेले)

**सदर शिष्यवृत्ती व फ्रीशिप चा अर्ज अचूक भरून वरील कागदपत्रासोबत ( नमूद केलेल्या क्रमानुसार ) हार्ड कॉपी महाविद्यालय कार्यालयात सौ. गायत्री बोन्हुडे यांचेकडे दिनांक १५.४.२०२४ पर्यंत त्वरित जमा करावा.**

प्रभारी प्राचार्य
प्र. प्राचार्य
पुणे-४११००४.